गुरूकुल ट्रस्ट चाळीसगाव, संचलित,

## तात्यासाहेब सामंत माध्यमिक विद्यायल, चाळीसगाव.

# गुरूकुल वार्तांकन

## तिमाही अहवाल माहे - एप्रिल - जून २०२६

सप्रेम नमस्कार,

'गुरूकुल ट्रस्ट' च्या तीनही विभागांचा त्रैमासिक अहवाल 'गुरूकुल वार्तांकन' रूपाने प्रकाशित करताना अतिशय आनंद होत आहे.

गेल्या शैक्षणिक वर्षात ( २०२५ - २६ ) गुरूकुल ट्रस्टच्या पुष्पाताई जोशी बालविकास मंदिराचा 'पालवी', हरणाताई जोशी प्राथमिक विद्यालयाचा 'गुजगोष्टी', तात्यासाहेब सामंत माध्यमिक विद्यालयाचा 'संवाद' असे तीन विभागांचे वेगवेगळे अंक प्रकाशित करण्यात आले. यावर्षी म्हणजेच सन २०२६ - २७ या शैक्षणिक वर्षात काळाचा बदल, गरज लक्षात घेऊन एकदम वार्षिक अंक प्रकाशित करण्याऐवजी,आम्ही तीनही विभागांच्या एकत्रित त्रैमासिक अहवालाचे ( एप्रिल २०२६ ते जून २०२६ ) संगणकीय प्रकाशन ( Digital Publication) करीत आहोत.

गुरूकुल ट्रस्ट चे ध्येय 'धर्म संस्थापना ' आणि उद्दिष्ट 'नराचा नारायण ' असे आहे. त्यानुसार वाटचाल करतांना विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. त्याचे प्रतिबिंब या वार्तांकनात उमटलेले दिसते.

बदलत्या काळानुसार, तंत्रज्ञानानुसार विद्यार्थ्यांना त्याचा लाभ व्हावा म्हणून इ. ३ री पासूनच AI आधारित संगणकीय अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

गुरूकुल ट्रस्ट च्या ध्येय - धोरणांनुसार वाटचाल करतांना 'गुरूकुल छात्रप्रबोधिनी' उभारण्याचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी खडकी शिवारात त्याचे भूमिपूजन करण्यात आले आहे.

गुरूकुल ट्रस्ट च्या या प्रवासात आपल्या सर्वांचेच सहकार्य आम्हाला मिळावे अशी विनंती.

प्रा. ल. वि. पाठक,

अध्यक्ष,

गुरूकुल ट्रस्ट, चाळीसगाव.

## ❖ एप्रिल २०२६

- दि. ०२ एप्रिल २०२६ रोजी हनुमान जन्मोत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी विद्यालयात व श्री.पंचमुखी हनुमान मंदिर, धुळे रोड येथे सामुदायिक हनुमान चालीसा पठण केले.




- दि. १४ एप्रिल २०२६ रोजी विद्यालयात गुरूकुल ट्रस्टच्या सर्व विभागाच्या शाळांनी एकत्रितपणे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त बुध्द प्रार्थना म्हटली व प्रतिमेला फुले अर्पण केलीत.
- दि.३० एप्रिल २०२६ रोजी विद्यालयातील इ. ५ वी ते इ. ९ वी च्या वर्गांचा वार्षिक निकाल विद्यार्थ्यांना वाटप केला.

## ❖ मे २०२६

- दि. २१ एप्रिल २०२६ ते ०२ मे २०२६ असे दहा दिवस विद्यालयात संगीत शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यात

बऱ्याच विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यांना वाद्य व गायनाचे धडे दिले गेलेत. श्री. तुषार मुजुमदार यांनी मार्गदर्शन केले.




- दि.०८ मे २०२६ रोजी इ. १० वी ( एस.एस.सी) चा निकाल ऑनलाईन घोषीत झाला. आपल्या विद्यालयातील एकूण ११६ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ झाले होते. विद्यालयाचा निकाल दरवर्षी प्रमाणे १००% लागला असून विशेष प्राविण्य - १९ विद्यार्थ्यांना ९०% पेक्षा अधिक गुण मिळाले. ५७ विद्यार्थी ७५% पेक्षा जास्त गुण मिवळून उत्तीर्ण झाले. कु. अक्षरा प्रशांत पाखले ९६% गुण मिळवून विद्यालयातून प्रथम आली.

- दि. १३ मे २०२६ रोजी खडकी शिवारातील सबस्टेशन जवळ विद्यालयाच्या मैदानावर नवीन वास्तूचे भूमीपूजन संस्थेचे सचिव डॉ. श्री. हरिशभाई दवे यांनी सपत्नीक केले यावेळी गुरूकुल ट्रस्टचे अध्यक्ष प्रा. श्री. ल.वि. पाठक सर व सर्व पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व आपल्या संस्थेवर प्रेम करणारे हितचिंतकही उपस्थित होते.





## ❖ जून २०२६

- दि. ०९ जून २०२६ रोजी गुरूकुल ट्रस्ट तर्फे सर्व विभागांचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि संस्थेचे सर्व पदाधिकारी यांचा परिचय व संवाद मेळावा पार पडला.






- दि. १० जून २०२६ रोजी गुरूकुल ट्रस्ट तर्फे सर्व विभागांच्या शिक्षकांसाठी डिजिटल मार्केटींग या बद्दल प्रशिक्षण देण्यात आले. मार्गदर्शक - कु. गौरी कुलकर्णी, श्री. यश पाठक व श्री. राहूल पवार (नाशिक ) हे होते.



- दि. ११ जून २०२६ रोजी गुरूकुल ट्रस्ट तर्फे सर्व विभागांच्या शिक्षकांसाठी अभ्यास नाट्य शिक्षक कार्यशाळा शिबीर आयोजित केले गेले. श्री. प्रकाश पारखी, पुणे यांनी नाट्यभिनय सादर करून घेतला.




- दि. १२ जून २०२६ रोजी गुरूकुल ट्रस्ट तर्फे सर्व विभागांच्या शिक्षकांसाठी अभिवाचन शिबीर आयोजित केले गेले. श्री. अशोक अडावदकर, पुणे यांनी उत्तमरित्या मार्गदर्शन करून सर्वांकडून अभिवाचन करवून घेतले आणि त्यात आवश्यक सुधारणावजा सूचनाही दिल्यात.






- दि. १३ जून २०२६ रोजी माजी विद्यार्थी मेळावा संपन्न झाला. गुरूकुलात १९९३ सालापासून ते २०२२ सालापर्यंतच्या जवळपास ७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यालयाप्रती असलेले कृतज्ञता भाव फक्त शब्दातून नाही तर कृतीतून करण्याचे आश्वासन विद्यार्थ्यांनी दिले.

  या मेळाव्यास गुरूकुल ट्रस्टचे पदाधिकारी, सर्व विभागांचे प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होते.

  खूपच ह्यदयस्पर्शी सोहळा पार पडला.





- दि. १५ जून २०२६ शाळा प्रवेशोत्सव उन्हाळी दीर्घ सुटीनंतर आज शाळा सुरू झाल्यानिमित्त नवीन वर्ष २०२६ - २७ च्या पहिल्या दिवशी उपस्थित असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत पेन्सिल भेट देऊन करण्यात आले. गुरूकुल ट्रस्ट चे पदाधिकारी व सर्व शिक्षक यावेळी उपस्थित होते. स्वागताचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. आकर्षक कमान शाळा प्रवेशद्वारावर उभारली होती.







- दि. १५ जून, १६ जून व १९ जून २०२६ रोजी एप्रिल महिन्यात प्रत्येक शिक्षकाला वाचनासाठी दिलेल्या पुस्तकाचा अभिप्राय सांगण्यासाठी समुहाने सर्व शिक्षक, संस्था पदाधिकारी व परिक्षक एकत्र आलेत. प्रत्येक शिक्षकाने आपला अभिप्राय सांगितला. परिक्षकांनी गुरूकुल ट्रस्ट च्या तीन विभागांमधून उत्तम वाचक क्रमांक काढले. त्यांना पारितोषिक समारंभात प्रमाणपत्र देऊन सन्मानीत करण्यात आले.





- दि. १६ व १७ जून २०२६ रोजी प्रकल्प या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. ज्ञान प्रबोधिनी, पुणे यांचे कडून श्री. नचिकेत नित्सूरे व श्री. ऋषिकेश कुलकर्णी यांनी गुगल मिट द्वारे मार्गदर्शन व शंका निरसन केले. यासाठी सर्व शिक्षक संगणक कक्षात उपस्थित होते.




- दि.२० व २१ जून २०२६ या दोन दिवशी जागतिक योगदिन निमित्ताने सर्व विद्यार्थी व गुरूकुल ट्रस्ट च्या तीन विभागांतील सर्व शिक्षकांनी योगासने केलीत. मार्गदर्शक म्हणून श्री. प्रशांत चित्ते, श्री. सचिन निकुंभ व श्री. विवेक देशपांडे सर यांनी योगासने करून दाखवले व त्यांचे महत्त्व स्पष्ट केले.







- दि. २२, २३ व २७ जून २०२६ रोजी इ. ५ वी, इ. ६ वी व इ. ७ वी च्या वर्गांतील विद्यार्थ्यांसाठी वर्षारंभ संकल्प दिन घेण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांनी ठरवलेला वैयक्तिक संकल्प व्यासपीठावर येऊन सांगितला व वर्षभरात पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.



- दि. २५ जून २०२६ रोजी इ. ५ वी ते इ. १० वी च्या वर्गांचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ - १ पार पडला. या समारंभास आपल्या विद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. समीर शेख, मुख्याधिकारी, नगरपरिषद खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विविध दानशूर दात्यांनी दिलेल्या देणगीतून यशस्वी विद्यार्थ्यांना पुस्तकी रूपाने बक्षीसे दिली गेलीत. तसेच श्री. रमेशजी जोशी, ( अमेरिका ) यांचे कडून इ. १० वीतून संस्कृतात व विद्यालयातून प्रथम पाच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली गेली. या समारंभाचे अध्यक्ष डॉ. श्री. हरिशभाई दवे हे होते.





- दि.  २९ जून २०२६ रोजी इ. ८ वी तील विद्यार्थ्यांसाठी विद्याव्रत संस्कार, प्रस्तावना व शारीरिक विकसन यावर व्याख्यान आयोजित केले गेले.



## शाळा समिती

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | डॉ. श्री. ह. र. दवे | चेअरमन |
| २ | डॉ. श्री. प्र. शं. पाठक | सदस्य |
| ३ | श्री. चं.ज. विंचुरकर | सदस्य |
| ४ | श्री. रा.अ. कुलकर्णी | सदस्य |
| ५ | श्री. गो. ना. सुर्यवंशी | सचिव व मुख्याध्यापक |
| ६ | श्री. अ.प्र. देवरे | शिक्षक प्रतिनिधी |

## गुरूकुल ट्रस्ट विश्वस्त मंडळ

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | प्रा. श्री. लक्ष्मीकांत विष्णू पाठक | अध्यक्ष |
| २ | डॉ. हरिश रमाकांत दवे | सचिव |
| ३ | डॉ. प्रसाद शंकर पाठक | विश्वस्त |
| ४ | डॉ. विवेक वसंतराव काटदरे | विश्वस्त |
| ५ | श्रीमती. सुनीता सुनील घाटे | विश्वस्त |
| ६ | श्री. आदित्य अजितकुमार घाटे | विश्वस्त |

Trust Regi. No : E – 0000465 ( JAL ) Dt. 19.12.1984
PAN NO. : AAATG7721L
TAN NO. : NSKT02440E
U/s 12 A Certificate No. : AAATG7721L25PN01
U/s 12AB (1) (b )
UDISE NO. : 27030500138